काकासाहेब तेथेंच होते । नाना जाऊन मशीदीते ॥
बाबांस निमंत्रिती लग्नातें । कर संपुटांते जोडून ॥ ३० ॥

तंव बाबा बरें म्हणती । सवें शाम्यांस नेई वदती ॥
पुढे दो दिवसीं काकाही पुसती । बाबांस आमंत्रिती मुंजीलें ॥ ३१ ॥

त्यांसही बाबा तेसेंच वदती । शाम्यास नेई म्हणती संगती ॥
काकासाहेब आग्रह करिती । स्वयें येण्याप्रती बाबांस ॥ ३२ ॥

तयावरीही तात्काळ उत्तर । काशीप्रयाग करूनि सत्वर ॥
शाम्याचेही येतों अगोदर । मज काय उशीर यावया ॥ ३३ ॥

आतां श्रोतीं या शब्दांवर । देऊन चित्त व्हावें अर्थपर ॥
पहावया तयांचे प्रत्यंतर । बाबांची सर्व व्यापकता ॥ ३४ ॥

असो भोजन झालियावर । माधवराव करिती विचार ॥
एकदां पदरीं पडतां ग्वालेर । काशी मग काय दूर असे ॥ ३५ ॥

रुपये खर्चीस घेतले शंभर । नंदरामाचे उसनवार ।
गेले बाबांचा घ्यावया रुकार । पुसती अति आदरपूर्वक ॥ ३६ ॥

आतां लग्ना मुंजी निमित्त । घडतसे जाणें ग्वालेरीपर्यंत ॥
काशी गया प्रसंगोपात्त । साधावी उचित वाटे मना ॥ ३७ ॥

तरी देवा पडतसें पाया । करूनि येऊं का काशीगया ॥
बाबांनीं आज्ञा दिधली जावया । माधवरायास आनंद ॥ ३८ ॥

आणीक वरतीं वदले तयासीं । वावगें तरी तूं काय पुससी ॥
सहज घडे जें अप्रयासी । अचूक तें निश्चयेसीं साधावें ॥ ३९ ॥

असो ऐसी आज्ञा झाली । माधवरावानीं गाडी केली ॥
वाट कोंपरगांवाची धरली । गांठ तव पडली आ[३]ची ॥ ४० ॥

---

१ माधवराव देशपांड्यांस. २ शिर्डीचा नंदराम मारवाडी. ३ आपा कोते.

आणावयास अपुली नात । आपा जात चांदवडा प्रत ॥
ऐकूनियां ती काशीची मात । उडी ते टाकीत तांग्यांतुनी ॥ ४१ ॥

करावया काशी प्रवास । पैसा जरी नव्हता गाठीस ॥
माधवरावासारखा सहवास । आपा कोत्यांस त्यागवेना ॥ ४२ ॥

माधवरावांनीं दिधला धीर । आपा कोत्यांस मग काय उशिर ॥
आनंदें गाडींत बैसले सत्वर । प्रसंगतत्पर होऊनी ॥ ४३ ॥

आपा कोते पाटील सधन । परी न मार्गी पैशाचें साधन ॥
तदर्थ त्यांचें काशी प्रयाण । चुकेल ही दारुण चिंता तया ॥ ४४ ॥

वाहत्या गंगेचिया आंत । हात धुवावे आलें मनांत ॥
माधवरावासारखी सोबत । साधावी मनोगत आपाचें ॥ ४५ ॥

असो ही त्याची वेळ जाणून । वेळीं तयासीं धीर देऊन ॥
माधवरावानीं सवें नेऊन । काशी त्या घडवून दीधली ॥ ४६ ॥

पुढें ते गेले नागपुरास । मुंजीचिया समारंभास ॥
काकासाहेब माधवरावांस । देती खर्चावयास दोनशें[1] ॥ ४७ ॥

तेथून गेले ग्वाल्हेरीस । तेथील लग्नसमारंभास ॥
नानासाहेब माधवरावांस । देती ते समयास शंभर[2] ॥ ४८ ॥

नानांचे व्याही श्रीमंत जठार । तयांनींही दिधले शंभर ॥
एशियारीती प्रेमसंभार । झाला गुरुबंधूवर नानांच्या ॥ ४९ ॥

काशीस मंगळ घाटावर । जडावाचें कोरींव सुंदर ॥
लक्ष्मी-नारायणाचें मंदिर । जयाचे हे जठार मालक ॥ ५० ॥

अयोध्येंतही श्रीराममंदिर । जठारांचें आहे सुंदर ॥
दोन्हीही क्षेत्रीं आदरसत्कार । तयांचे मुनीमांवर सोंपविला ॥ ५१ ॥

---

१ दोनशे रुपये. २ शंभर रुपये.

ग्वाल्हेरीहून मथुरे गेले । सर्वे ओझे[1] बिनीवाले[2] ॥
पेंढारकरही[3] होते आले । तिघेही परतले तेथून ॥ ५२ ॥

माधवराव आणि कोते । तेथून प्रयागा झाले जाते ॥
रामनवमीच्या उत्सवातें । अयोध्ये आंतौते प्रवेशले ॥ ५३ ॥

दिन एकविस तेथे राहिले । महिने दोन काशींत काढले ॥
चंद्रसूर्य ग्रहण झालें । दोघे मग निघाले गयेस ॥ ५४ ॥

गयेंत ग्रंथी ज्वराची साथ । गल्लोगल्लीं जन सचिंत ॥
ऐसी तेथें परिसिली मात । असतां अग्निरथांत दोघांनीं ॥ ५५ ॥

अग्निरथ स्टेशनांत । येऊन थांबतां पडली रात ॥
तेथेंच मग धर्मशाळेंत । दोघेही स्वस्थ विसावले ॥ ५६ ॥

असो होतां प्रातःकाळ । भेटीस आला गयावळ ॥
तो वदे करा उतावळ । यात्राही सकळ चालली ॥ ५७ ॥

माधवराव उद्विग्न चित्त । तयालागीं हळूच पुसत ॥
येतों परी ज्वराची साथ । तुमचिया वस्तींत आहे का ॥ ५८ ॥?

मग तो तया देई उत्तर । येऊनि पहा कीं हो तेथवर ॥
तेथें नाहीं तसला प्रकार । चला मजबरोबर निःशंक ॥ ५९ ॥

असो पुढें हे दोघेजण । गयावळाचे येथें जाऊन ॥
पाहूनि त्याचें सदन विस्तीर्ण । प्रसन्नांतःकरण जाहले ॥ ६० ॥

प्रसन्नतेचे आणीक कारण । ते जों तेथें बैसती जाऊन ॥
समोर बाबांची छबी पाहून । माधवराव गहिंवरून दाटले ॥ ६१ ॥

---

१ पळस्थ्याचे ओझे आडनांवाचे इनामदार. २ हे नानासाहेबांचे साडू. ३ हे नानासाहेबांचे जामात.

नव्हते कधींही ध्यानी मनीं । गयेसारिख्या दूर ठिकाणीं ॥
पडेल साईची छबी नयनीं । आश्चर्य मनीं दोघांच्या ॥ ६२ ॥

माधवराव अति गहिंवरले । आनंदाश्रू नयनीं लोटले ॥
कां हो आपण रडूं लागले । ऐसें त्यां पुसिलें गयावळें ॥ ६३ ॥

कांहीं एक नसतां कारण । माधवराव करितां रूदन ॥
गयावळ होय संदेहापन्न । जाहला उद्विग्न मानस ॥ ६४ ॥

गयेमाजी ग्रंथिज्वर । कैसी यात्रा घडेल निर्धार ॥
माधवरावा मनीं हा विचार । गयावळ फार चिंतापला ॥ ६५ ॥

आधींच आपण कळविलें होतें । कीं ग्रंथिज्वर नाहीं येथें ॥
तरीही आपण करितां चिंतेतें । आश्चर्य आम्हातें वाटतें ॥ ६६ ॥

नसेल आम्हावरा विश्वास । पुसून घ्याना या अत्रधियांस ॥
येथें न भीति तुमचिया केसास । पाणी कां डोळयांस आणितां ॥६७॥

घेतला ग्रन्थीचे साथीचा धसका । मोडली जयाचे धैर्याची बैसका ॥
म्हणून रडे हा यात्रेकरू देखा । ऐसा हा एकसारखा निष्कारण॥६८॥

म्हणोनि गयावळ करी समजी । माधवरावाचे मनामाजी ॥
माझ्या आधींच माउली माझी । कैसी ही आजि मजपुढें ॥ ६९ ॥

"काशी प्रयाग करानि सत्वर । शाम्याच्याही येतों अगोदर" ॥
हे जे बाबांचे पूर्वील उद्गार । ते हें प्रत्यंतर मूर्तिमंत ॥ ७० ॥

छबी बाबांची डोळ्यासमोर । दिसतां गृहप्रवेशाबरोबर ॥
पाहूनि हा अकल्पित प्रकार । वाटला चमत्कार अत्यंत ॥ ७१ ॥

कंठी प्रेमाचा गहिंवर । डोळां आनंदाश्रूंचा पूर ॥
उठले रोमांच सर्वांगावर । फुटला पाझर घर्माचा ॥ ७२ ॥

ऐसी माधवरावांची स्थिति । गयावळाचे विपरीत चित्तीं ॥
ग्रंथि ज्वराची पडली भीति । म्हणोनि हे रडती सत्य वाटे ॥ ७३ ॥

शामाच पुढें जिज्ञासा प्रेरित । गयावळासी पृच्छा करीत ॥
कैसेनि ही तुम्हांसी प्राप्त । कथा हें साद्यंत आम्हाते ॥ ७४ ॥

पुढें गयावळ सांगूं लागला । समग्र वृत्तांत माधवरावाला ॥
बारा वर्षांमागें जो घडला । नवलाव झाला परिसा तो ॥ ७५ ॥

एक ना दोन तीनशें नोकर । गयावळाचे पगारदार ॥
मनमाड आणि पुणतांब्यावर । यात्रा सविस्तर नोंदीत ॥ ७६ ॥

यात्रेकरूंची लावावी सोय । गयावळांचा नित्य व्यवसाय ॥
चालले असतां ऐसें कार्य । गयावळ हा जाय शिरडीतें ॥ ७७ ॥

साई समर्थ मोठे संत । ऐसी त्यानें परिसिली मात ॥
व्हावें तयांच्या दर्शनें पुनित । धरिला हा हेत तयानें ॥ ७८ ॥

घेतलें साईबाबांचें दर्शन । करूनियां पायांचें वंदन ॥
छबी तयांची व्हावी संपादन । इच्छाही निर्माण जाहली ॥ ७९ ॥

होती माधवरावापाशीं । छबी एक टांगिली भिंतीशी ॥
गयावळ मागूं लागला तियेसीं । पुसूनि बाबाशीं ती दिधली ॥८०॥

तीच कीं ती आपुली छबी । तीच गयावळ हें मग आठवी ॥
तेथेंच बाबा कैसें मज पाठवी । कैसें मज भेटवी दीर्घकाळें ॥ ८१ ॥

वस्तुस्थिती पाहूं जातां । बारा वर्षांमागील वार्ता ॥
कोण किमर्थ कीं ही स्मरता । कधीं न चित्ता आठवली ॥ ८२ ॥

परी बाबांची अगाध लीला । तेथेंच पाठविलें शामाला ॥
तेथेंच दिधलें निजदर्शनाला । गयावळही धाला अत्यंत ॥ ८३ ॥

हीच कीं दिधली अपुले येथून । साईबाबांची आज्ञा घेऊन ॥
याच गयावळा लागून । जाहलें स्मरण शामास ॥ ८४ ॥

यांचेच येथें पूर्वीं आपण । उतरलों होतों शिरडीस येऊन ॥
यानींच बाबांचें करविलें दर्शन । जाहलें स्मरण गयावळा ॥ ८५ ॥

मग परस्पर कृतोपकार । नाहीं आनंदा पारावार ॥
ठेविली उत्तम व्यवस्था फार । त्यांनीं गयेवर शामाची ॥ ८६ ॥

तया घरची काय श्रीमंती । दारीं जयाचे झुलती हत्ती ॥
आपण पालखीमाजी बैसती । शामास बैसविती हत्तीवर ॥ ८७ ॥

आनंदें विष्णुपदावर जाऊन । पूजासंभार सर्व घेऊनी ॥
घातलें देवास अभिषेक स्नान । केलें पिंडप्रदान यथाविधी ॥ ८८ ॥

जाहलें मग ब्राह्मण संतर्पण । नैवेद्य समर्पणपूर्वक भोजन ॥
आनंदें झाली यात्रा संपूर्ण । घेतली करवून बाबांनीं ॥ ८९ ॥

असो या सर्व कथेचें सार । सार्थ बाबाचे मुखोद्गार ॥
अनुभवा येती अक्षरें अक्षर । प्रेमही भक्तांवर अनिवार ॥ ९० ॥

हें तर काय भक्तप्रेम । इतर जीवांसही देखत सम ॥
तयांसीं ही तादात्म्य परम । आवड ही निःसीमतयांची ॥ ९१ ॥

कधीं लेंडीहून मशीदीयेतां । सहज मार्गें चालतां चालतां ॥
कळप एकादा शेळ्यांचा भेटतां । परमानंदता बाबांस ॥ ९२ ॥

तंव त्या समस्त कळपांवरून । निज अमृत दृष्टी फिरवून ॥
त्यांतून कधीं एक व दोन । शेळ्या ते निवडून काढित ॥ ९३ ॥

धणी मागेल जी ती किंमत । बाबा तत्काळ देऊनि टाकित ॥
कोंडाजीचे पाशीं ठेवित । ऐसी ही पद्धत बाबांची ॥ ९४ ॥

एके दिवशीं शेळया दोन । किंमत बत्तीस देऊन ॥
बाबा आले खरीदून ॥ सकळां लागून आश्चर्य ॥ ९५ ॥

पडतां या दोनी दृष्टी । अवचित आवडी उपजली पोटीं ॥
जाऊनियां तयांचे निकटीं । पाठी थोपटी तयांची ॥ ९६ ॥

पशु जन्मीं देखूनि उभयतां । कृपा उपजली साई समर्था ॥
स्थिती पाहोनि कळवळले चित्ता । प्रेमोद्रेकता दाटली ॥ ९७ ॥

घेवोनियां तयांसीं जवळी । साई प्रेमें तयां कुरवाळी ॥
साश्चर्य झाली भक्तमंडळी । पाहोनि नव्हाळी बाबांची ॥ ९८ ॥

पूर्वजन्मींचा लोभ परम । स्मरला साईस आलें प्रेम ॥
पाहूनि तयांचा पशुजन्म । कळवळा अप्रतिम उपजला ॥ ९९ ॥

दोन रुपये जीची किंमत । तीन अथवा चार तिजप्रत ॥
देती बाबा सोळा हें विपरीत । पाहोनि हो चकित तात्याबा[1] ॥ १००

"देई वाणी घेई प्राणी" । ऐसें प्रत्यक्ष देखूनि नयनीं ॥
तात्यासह माधवरावांनीं । धिक्कारिली करणी बाबांची ॥ १०१ ॥

दोहोंचे माला सोळा कां देती । बाबांस पैशाची किंमत का नव्हती ॥
कीं ते यथेच्छ कांहीं तरी करिती । ऐसीही उपपत्ती बैसेना ॥१०२॥

दोघे अंतरीं बहु चडफडती । ऐसा कां बाबा हा सौदा करिती ॥
दोघेही बाबांस दूषण देती । ही काय रीती सौद्याची ॥ १०३ ॥

ऐसे कैसे बाबा फसले । पाहूं अवघे लोक तैं जमले ॥
बाबा अंतरीं स्वस्थ ठेले । जणों न हरवलें यत्किंचित ॥ १०४ ॥

---

१ तात्या गणपत पाटील कोते.

जरी हे दोघे ऐसे कोपले । बाबांस दूषण देऊं सरले ॥
तरी न बाबा यत्किंचित ढळले । अचल ठेले शांती सुखें ॥ १०५ ॥

मग आदरोनि विनयवृत्ती । दोघेही ते बाबांस पुसती ॥
ही काय उदारपणाची रीती । रुपये बत्तीस गेलेना ॥ १०६ ॥

केवळ पैशाचा तो प्रश्न । परिसोनि साई हास्यवदन ॥
मनीं म्हणे हे वेडे जन । कैसें त्यां समाधान करावें ॥ १०७ ॥

परी बाबांची शांती विलक्षण । स्थैर्य न ढळे अणु प्रमाण ॥
हेंच परम शांतीचें लक्षण । आश्चर्य अवघेजण करिती ॥ १०८ ॥

क्रोध नाहीं जयाच्या गांवीं । परमशांतीच जो अनुभवी ॥
भूतमात्रीं जो भगवंत भावी । कैशी त्या शिवावी अविवेकता ॥१०९॥

विवेकदृष्टीचे जे निधडे । क्रोध येऊं न देती पुढें ॥
विपांये जैं हा प्रसंग जडे । भांडार उघडे शांतीचें ॥ ११० ॥

अल्लामालिक निरंतर ध्यान । तयाचें काय वानू महिमान ॥
चरित्र अगाध आणीक गहन । अतिपावन हितकर ॥ १११ ॥

ज्ञान गर्भ वैराग्यनिधी । निजशांतीचा जो उदधी ॥
करुणा परिपूर्ण जयाची बुद्धि । वदला त्रिशुद्धी तें परियेसा॥११२॥

पाहूनियां दोघांचा आग्रह । बाबांनींही केला निग्रह ॥
ज्या मज बसाया ठाव ना गृह । त्या मज संग्रह किमर्थ ॥ ११३ ॥

म्हणाले जाऊनि दुकानांत । आधीं आणा डाळ विकत ॥
चारा शेरभर त्यां मनमुक्त । मग द्या त्या परत धनगरा ॥ ११४ ॥

---

१ अकल्पित.

आज्ञेनुसार मग तात्काळ । शेळ्यांस खावं घातली डाळ ॥
मग कांहींही न दवडितां वेळ । पाठविल्या परत कळपांत ॥ ११५ ॥

मूर्तिमंत परोपकार । तो हा प्रत्यक्ष साईअवतार ॥
तयास तात्या, शामा, वा इतर । काय सुविचार सुचवितील ॥११६॥

डाळ चारवूनि परमप्रीती । पाहूनि शेळ्या पावल्या तृप्ती ॥
मग म्हणती द्या धनिया प्रती । घेवोत विश्रांती कळपांत ॥११७॥

रुपये गेले रुपया परी । शेळ्या गेल्या फुकटवारी ॥
पुढें गत जन्मीची नवलपरी । कथिली सारी बाबांनीं ॥ ११८ ॥

जैसा तात्या तैसाच शामा । दोघांवरीही बाबांचा प्रेमा ॥
तयांचिया कोपोपरमा । कथिति मनोरमा आख्याइका ॥ ११९ ॥

साई स्वयें होऊनि आपण । दोघांलागी करिती निवेदन ॥
शेळ्यांचें पूर्वजन्माचें कथन । श्रोतांही श्रवण कीजे तें ॥ १२० ॥

पूर्वजन्मीं यांचें सुदैव । तेव्हां हे जीव होते मानव ॥
मजपाशींच बसावया ठाव । कर्मप्रभाव यांना हीं ॥ १२१ ॥

या ज्या शेळ्या दिसती तुम्हां । होते हे बंधू पूर्वजन्मा ॥
भांडतां परस्पर झाली सीमा । ते या परिणाम पावले ॥ १२२ ॥

बंधू बंधूंत आरंभीं प्रेम । एकत्र अशन शयन [1]क्षेम ।
नित्य चिंतिती कुशल क्षेम । एकात्मतापरम उभयांसी ॥ १२३ ॥

ऐसे दोघे जरी सहोदर । कर्मधर्मसंयोग दुर्धर ॥
द्रव्यलोभ अति भयंकर । पाडिलें वैर परस्परीं॥ १२४ ॥

---

१ जेवणखाण.

ज्येष्ठ बंधू महा आळसी । कनिष्ठ व्यवसाई अहर्निशी ॥
तेणें जोडिल्या द्रव्य राशी । मत्सर ज्येष्ठांसी संचरला ॥ १२५ ॥

काढूनियां टाकावा कांटा । मग द्रव्याचा नाहीं तोटा ॥
ऐसिया विचारें आडवाटा । आवडल्या ज्येष्ठा धनलोभें ॥ १२६ ॥

धनमोहें दृष्टि प्रतिबंध । डोळे असतां जाहला अंध ॥
विसरला बंधुप्रेमसंबंध । जाहला सन्नद्ध तद् घाता ॥ १२७ ॥

परम कठिण प्रारब्धभोग । उपजला निष्कारण वैरयोग ॥
फुटले गुप्त कपटप्रयोग । लोभावेगें अनावर ॥ १२८ ॥

होतें त्यांचें आयुष्य सरलें । बंधुत्वप्रेम समूळ विसरले ॥
दुराभिमानें अत्यंत खवळले । वैरीसे झगटले परस्पर ॥ १२९ ॥

सोटा हाणोनियां माथा । एकानें दुजिया पाडिलें खालता ॥
तेणें कुऱ्हाडीचिया आघाता । सरसा निज भ्राता मारिला ॥ १३० ॥

मग ते दोघे पडले मूर्छित । छिन्न भिन्न रुधिरोक्षित ॥
अल्पावकाशें असुविरहित । पावले पंचत्व दोघेही ॥ १३१ ॥

ऐसा त्याचा होतां अंत । प्रवेशले ते या योनींत ॥
ऐसा यांचा हा वृत्तांत । स्मरला मज साद्यंत तयां पहातां ॥१३२॥

ते कृतकर्म भोगावयासी । आले शेळीचिया जन्मासी ॥
अवचित कळपांत देखतां त्यांसीं । प्रेमावेशीं आलों मी ॥ १३३ ॥

म्हणून खर्चोनि पल्लवचे दाम । वाटलें तयांसी द्यावा विश्राम ॥
तुमचिया मिषें तयांचें कर्म । आडवें कीं ठाम तयांपुढें ॥ १३४ ॥

शेळियांलागीं दया पोटीं । परी तुमचिया आग्रहासाठीं ॥
मीही जाहलों कबूल शेवटीं । द्यावया त्यापाठीं धनगरा ॥ १३५ ॥

---

१ लोभाचा झटका.

असो येथें संपली कथा । क्षमा करावी मजला श्रोतां ॥
पुढील अध्याय पुढां परिसतां । आनद चित्ता होईल ॥ १३६ ॥

तोही परम प्रेमभरित । तेंही साईमुखींचें अमृत ॥
हेमाड साई चरणीं विनत । होऊनि विनवीत श्रोतयां ॥ १३७ ॥

इतिश्री संतसज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ।
श्री साईसमर्थ सच्चरिते । काशीगयागमन अजाजन्म कथनं नाम
षष्टचत्वारिंशोध्यायः संपूर्णः ॥

श्रीसद्गुरूसाईनाथार्पणमस्तु । शुभंभवतु ॥

शिर्डी येथील

# श्री सद्गुरु

# साईनाथ सगुणोपासना.

हें पुस्तक मूळ वे० स० कु० भीष्म यांनी शके १८३३ त तयार केलें होतें. सांप्रत त्याची सुधारून वाढलेली नवीन आवृत्ती छापण्यांत आली आहे.

श्रीसमर्थ साईनाथ महाराज यांच्या त्रिकाल आरतीचे वेळी म्हटली जाणारी पद्ये व भजनकाळी म्हणावयाजोगी सदर शास्त्री भीष्म यांनी तयार केलेली पद्यें, परापूजा व मानसपूजा यांचा या लहानशा पुस्तकांत संग्रह केला आहे. पुस्तकाची किंमत दोन आणे ठेविली आहे.

**हरि सीताराम दीक्षित**

पुस्तक मिळण्याचें ठिकाण--श्री साईलीला ऑफीस.

**रा. रा. गोविंद रघुनाथ दाभोलकर,**

५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रें.

**चिटणीस श्री शिर्डी संस्थान कमिटी**

शिर्डी, पो. राहते, जि. अहमदनगर

---

# श्री साईनाथ भजनमाला

## सुधारून वाढविलेली आवृत्ति

मालेचे कर्ते रा रघुनाथराव तेंडुलकर यांच्या निधनानंतर आतां मालेची पुनरावृत्ती छापविणें नाही साईभक्तांनी माला मागविण्याची त्वरा करावी, कारण प्रती फार थोडया शिल्लक राहिल्या आहेत.

**सावित्रीबाई तेंडुलकर.**

माला मिळण्याचा पत्ता --**श्रीमती सावित्रीबाई तेंडुलकर,**

रगाऱ्याची चाळ, वांद्रे. बी. बी. सी आय्. रेल्वे.

श्री साईलीलेत जाहिराती घेण्याचे ठरविले आहे. या पानावरील सर्व जागा जाहिरातीकरितां मोकळी आहे. जाहिरात देणारानें आमचेकडे पत्रव्यवहार करावा. खालील पुस्तके आमचेकडे मिळतील. श्रीसाईनाथ ... पासना कि. ८= ह. भ. प. दासगणु कृत—संतलीलामृत, भक्तलीलामृत.

गो. र. दाभोळकर ५ सेंट मार्टिन्स रोड, बांद्रे मुंबई न. २०

श्री साईनाथ भजनमाला, श्रीमति सावित्रीबाई तेंडुलकर, रंगाऱ्याची चाळ वांद्रें येथे मिळेल.

सर्व प्रकारचे मेंदूचे विकारांवर जाग्रण व मानसिक श्रम करणाऱ्यांस अत्यंत उपयोगी

नकलेबद्दल ] ब्राह्मी तेल [ सावध रहावें.

बाळबाळंतिणीकरितां औषधें

बाळंत काढा नं. १ पहिल्या दहा दिवसांचा ८१४, बाळंत काढा नं. २ दहा दिवसानंतर ८१४; बाळकडू.-मूल जन्मल्यापासून देण्यास योग्य ८८, कुमारी आसव लहान मुलांकरितां ८१२.

सतत २५ वर्षें लोकादरास पात्र झालेलें; कोणत्याही ऋतूंत घेण्यास योग्य, अत्यंत मधुर व आरोग्यदायक

एक रत्तल १८१० } द्राक्षासव { अर्धा रत्तल ८१४
दीड रत्तल २८४ } { ट ख पॅ. नि.

शिवाय आमचे कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवे, अरिष्टे, भस्मे वगैरे ५०० वर औषधे तयार आहेत. त्यांचे माहितीचा मोठा क्याटलाग व प्रकृतीमान भरून पाठविण्याकरितां "रुग्ण-पत्रिका" ही सात आण्याची तिकिटे आली असता पाठवू.

दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स

आर्यौषधी कारखाना, चेंबूर जि. ठाणें.

टे. नं. ८७०२४ X २२२७८ दुकान दवाखाना ठाकुरद्वार मुंबई नं. २

हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, ३६४ ठाकुरद्वार, मुंबई येथें अनंत आत्माराम मोरमकर यांनीं छापून ... तर्खड यांनी ५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रे येथें प्रसिद्ध केलें

श्री साईनाथ प्रसन्न

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष ५ वें ] [ अंक २-३

नलिनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम् ।

क्षणमिह सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥

श्री शंकराचार्य.

संपादक:—लक्ष्मण गणेश महाजनी.

प्रकाशक.— रामचंद्र आत्माराम तर्खड.

[illegible] ५ [illegible]

# अनुक्रमणिका


केकावली—श्री. के. स. केळकर ... ... ...

श्रवणाचा उद्देश—श्री. नी. रा. सहस्रबुद्धे ... ...

नृसिंह बाबा महाराज पांचलेगांवकर ( छायाचित्र )

श्वर-त्यांचे दैवत ( „ )

मी ... ... ... ... ...

र्माची मुख्य तत्वें—श्री. चिंतामणराव वैद्य ...

व अभिप्राय ... ... ... ...

नं.चे शिर्डी संस्थानचे कार्यकारी मंडळ व भक्तमंडळाची यादी ... ... ...

भक्तमंडळाचे नियम .. ... ... ...

महाराजांचे अनुभव ... ... ... ...

गुरु-प्रसादोद्गार—श्री. रामय्या ... ... ...

श्रीसाई सच्चरित—श्री. हेमाडपत ... ... ...


## वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिआर्डरीनें अगाऊ रु.

पी. नें रु. ३॥ फुटकळ अंक ।=. मागील अंकास शिल्लक अस

# केकावली.

( लेखक—के. स. केळकर. )

केकावली म्हणजे ती मयूराची हे सांगावयास नको. पंतांनीं पुष्कळ काव्ये केलीं, पण मयूराच्या स्वतःच्या डोक्यांतून निघालेली अशी केकाच. पंतानीं आर्यावृत्त प्रचारांत आणून भारतभागवतादि अनेक प्राकृत ग्रंथ व कित्येक संस्कृत ग्रंथही केले. महाराष्ट्र कविमुकुटमणीचे पद यांस मिळाले आहे. मराठी भाषेस प्रतिष्ठा प्राप्त होण्यास पंताचे श्रम पुष्कळ अंशीं कारणीभूत झाले याबद्दल शंका नाहीं. त्यांचा ग्रंथ तीन लक्ष आहे, परंतु त्या ग्रंथाचा पुष्कळसा भाग भारत, भागवत, रामायण व पुराणांतील अनेक कथा यानींच वाढला आहे. आतां हे केवळ संस्कृत ग्रंथाचे शब्दशः भाषांतर नाहीं हें खरे. त्यांत उत्तम काव्यही आहे यांत शंका नाहीं. परंतु लिहिण्यास विषय भरपूर मिळाला व त्यामुळे पंताची स्वतःची कल्पकता त्यांत विशेष दिसून आली नाहीं.

काव्य म्हणजे त्याचे दोन भाग आहेत. कवीची कल्पना, सुंदर व उच्च मनोभाव, कधीं आनंदी, कधीं प्रेमयुक्त, कधीं विचारी, कधीं शोकमग्न असे अंतःकरण, व कवितासृष्टि उत्पन्न करण्याच्या आधींची एक प्रकारची चित्ताची गंभीर एकाग्रता हीं ज्यांत दिसतात तो एक भाग. आणि हे उच्च मनोभाव, ही मनाची निरनिराळी स्थिति, ही कवितासृष्टि, दुसऱ्यास दाखविण्याकरितां विषयास साजेल अशी वृत्तयोजना व सुंदर शब्दरचना हा दुसरा भाग. तेव्हां पंतांच्या भारत-रामायणादि काव्यांत स्वतःची कल्पकता नाहीं असे मी म्हटले, त्याचा अर्थ हा कीं, पहिला भाग म्हणजे मी म्हटल्याप्रमाणे कवितासृष्टि निर्माण करणे, हा भाग त्यांत फार कमी दिसतो. दुसरा भाग मात्र त्यांत पूर्णपणे आहे हें निर्विवाद आहे.

परंतु उत्तम काव्यांत पहिला भाग प्रधान असून दुसरा भाग गौण असे गणलें जातें. मग दोनही भाग उत्तम असें असणें शक्यच नाहीं कीं काय? होय शक्य आहे. स्वभाव व वर्तन उत्तम असणाऱ्यानें आहेत चांगला पोषाख

घालूं नये असें थोडेंच आहे ? पण पहिल्या भागाकडे जितके जास्त लक्ष असेल आणि---याकडे जितके लक्ष द्यावे तितके थोडेच आहे---त्या मानानें दुसऱ्या भागाकडे साहजिक लक्ष कमी राहतें; आणि मोरोपंतांच्या केकावलींत हे दिसते. त्यांची तीं अर्ध्या अर्ध्या चरणांचीं यमके जेथलीं तेथेंच राहिलीं. श्लेषही दोनचार ठिकाणींच व तोही एकेका शब्दावर आला; व सबंध श्लोकाचे दोन अर्थ असा प्रयत्न तर कोठेंच नाहीं. अशीच सर्व शब्दालंकारची स्थिति झाली. साराश, इतका ऊहापोह करण्याचा हेतु पंतांस कविमुकुटमणीच्या पदापासून खालीं ओढण्याचा किंवा त्यांच्या कवितेत काव्य---उत्तम प्रकारचें काव्य---कोठेंच नाहीं असे म्हणण्याचा नव्हे. तर ज्या मानाने त्यांचा ग्रंथ वाढला आहे, त्या मानानें स्वतःच्या अंतःकरणापासून निघून, दुसऱ्याच्या अंतःकरणास जागृत करण्यासारखें काव्य कमी आहे. व पंतांच्या इतर ग्रंथांपेक्षां केकावलींत हा वरील गुण उत्तम प्रकारें वास करीत असल्यामुळे ती मला श्रेष्ठ वाटते, हे दाखविण्याचा हेतु आहे. आणि म्हणूनच प्रथम मी म्हटले कीं, मयूराची स्वाभाविकपणे निघालेली अशी केकावलीच.

महाराष्ट्रांतील व बहुतांशीं सर्व हिंदुस्थानांतील कवि व संत यांचे पृथक्वर्ग बांधणे कठीण आहे. बहुतेक मंडळी कवि असून संत व संत असून कवि अशी होती. संत व कवि यांचा अभेद असल्याने, महाराष्ट्र कवितेचे एकंदर स्वरूप वैराग्यशील व परमार्थसाधक असे झालं आहे. याची सत्यता केवळ ' ग्यानबा तुकाराम ' यांच्या ग्रथांतच दिसते, असे नव्हे. कवि म्हणूनच ज्याची प्रसिद्धि आहे, अशा मोरोपंताच्या काव्यातही हेंच दिसून येतें. त्या वेळच्या धर्मसंबंधीं काव्याचे साधारणतः इतके प्रकार दिसून येतातः---

१ ज्ञानेश्वरीप्रमाणें गीता वगैरे ग्रंथांवर टीका. २ पुराणांतील कथा. ३ भक्तिविजय वगैरे प्रमाणें संतचरित्रकथन व संतमहिमावर्णन. ४ निरनिराळ्या देवतांचीं स्तोत्रें, आरत्या वगैरे. ५ तीर्थांचीं वर्णनें. ६ कीर्तनभजन यासाठीं देवास संबोधून पदें, अभंग इत्यादि रचणें. ७ लोकांस संबोधून उपदेशपर कविता रचणें इत्यादि.

या दृष्टीने पाहिले असता पंतांचे भारत, भागवत, रामायणादि ग्रंथ पौराणिक कथा या खालीं येतील. गीतेचे भाषांतर आहेच. सन्मणिमाला व ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, कबीर, तुकाराम वगैरेची स्तुति, गंगास्तुति, कृष्णामहात्म्य वगैरे तीर्थांचीं वर्णने, गजाननस्तव, मारुतिस्तुति, आरतीं-संग्रह वगैरे वगैरे पुष्कळ आहेत. परंतु भक्तीचे विशेष अंग म्हणजे पंतांच्या स्वतःच्या धर्मविषयक कल्पना, आत्मपरीक्षण, परमेश्वराच्या दर्शनाची आतुरता व देवास संबोधून प्रार्थना वगैरे भाग संशयरत्नमालेत व विशेषतः केकावलींत फार उत्तम दिसतात. आता तुकारामाच्या गाथेंत ज्याप्रमाणे भक्तीचे यथायोग्य विस्ताराने व सर्व अंगानें निरूपण केले आहे, त्याप्रमाणें पंतांचें झाले नाहीं. यासाठीं कवि म्हणूनच पंतांची प्रसिद्धि आहे, असे वर म्हटलें. तथापि थोडक्यात का होईना, पण केकावलींत त्यांची स्वतःची धर्मकल्पना दिसून येते.

तेव्हा स्वतःच्या अंतःकरणापासून निघालेली आणि मराठी कवींच्या कवितेतील विशेष गुण जो भक्ति त्याने पूर्ण, अशा दोन गुणांमुळे पंतांच्या काव्यांत मी केकावलीचें फार महत्त्व समजतों. परंतु केकावली स्वकल्पित कशावरून व तींत भक्तीचे असे काय विचार भरले आहेत, हें पाहणें अजून राहिलेच आहे. म्हणून या दोन गुणांबद्दल मुख्यत. विवेचन करून, इतरही गुणांचा मी उल्लेख करणार आहे. या पूर्वी, ज्यानीं केकावली समग्र वाचली नसेल, त्याच्यासाठीं तिचा थोडक्यांत सारांश काय आहे हे पाहिले पाहिजे.

पहिल्या श्लोकांत रीतीप्रमाणे नमन आहे. एकदम मोठालीं पदें व कठीण समास पाहून गोंधळांत न पडता व सबंध श्लोकात “ दा ” हें अक्षर किती वेळा आलें आहे, हे मोजीत न बसता पुढें वाचीत गेल्यास बहुतेक केका विशेष कठिण नाहींत असे दिसून येईल. ग्रंथाचा विषय केवळ नाटका-सारखा करमणुकीचा असतांही एखाद्या तत्त्वज्ञानावरील ग्रंथाप्रमाणें पहिल्या नांदीमध्ये थेट ‘वेदान्तेषु यमाहुरेक पुरुष’ येथून सुरवात करून कवि आपले सर्व तत्त्वज्ञान ओतीत असतो; ही बरीच प्राचीन रीत दिसते. मग केकावली तर भक्तिविषयक ग्रंथ. तरी पंतांनीं सर्व विशेषणें पुढील विषयास योग्य

अशींच योजिलीं आहेत. सदाश्रितपद, साधुसंत देवादिक ज्यास्त भजतात, अशाची भक्ति आपण तर अवश्य केली पाहिजे; असा विचार उत्पन्न झाला बरे, ज्यास शरण जावयाचे तो 'स्वदासवश मानस' म्हणजे भक्तवत्सल 'कामदा' सर्व इच्छा पुरविणारा, शिवाय 'कलिमलांतक' अनंत पाप नाहीं करणारा, असा असल्याने इच्छा जास्त दृढ झाली. व म्हणून शंख, चक्र, गदा इत्यादि धारण करणाऱ्या विष्णूस नमन करून कवि विनंती करतात "अजामिळासारखे अनेक पापी तूं तारलेस असे 'बुध वर्णिती' मग मी मात्र 'तसाचि उरलों कसा?' काय मी पतित नाहीं? कीं कृपा सरली? कीं दिसलो नाहीं?" असे संशय घेतले आहेत. संशयरत्नमालेत असेच अनेक संशय आहेत. नंतर यापैकीं कोणतेही शक्य नाहीं, असे लागलेच उत्तरही देतात.

"पुराणांतरीच्या अनेक उदाहणांवरून तूं अत्यंत भक्तवसल आहेस असे दिसते; पण मला पावत नाहींस म्हणून मी तुला आळशी म्हणतो. हा आळ तू सहन करूं नकोस, म्हणजे मला पाव. तूं कृपा करशील असा मला भरंवसा आहे. साधारण लोक गंगा त्यास शुद्ध करील, इतर देव तारतील असे समजतात. पण मी इतका पापी आहे कीं, तुजशिवाय दुसरा त्राता कोणी नाहीं. तूं मला काहीं दिले नाहींस, असे नाहीं. अनेक देणग्या दिल्या आहेस. पण 'पुरती दया करा;' तुमचीं पावले पाहीन तर सर्व पावले नाहीं तर सगळें व्यर्थ. पावले द्या नाहीं तर सगळे परत घ्या. पण असे केल्याने तुमची अपकीर्ति होईल म्हणून पुरती दयाच करा. हे पतितपावना मी अनन्यभावाने शरणच आलों नाहीं; नाहीं तर तुम्ही शरण आलेल्यास खात्रीनें तारता." पुढे कवि म्हणतात "मला सत्संग द्या. मी स्वतःला संतास विकून घेण्यास तयार आहे. मला, त्यांची सेवा कशी करावी हे माहीत आहे. हे विश्वपते, माझा लोखंडाचाही संग्रह करा. मी सदा भिकारीच राहणार असे नाहीं. तुमचा अनुग्रह होताच माझी योग्यता वाटेल. सध्या मला येते तसी आपली स्तुति करतो. तुम्हाला ही स्तुति फार आवडते. तेव्हा कितीही कुरूप असली तरी माझ्या या स्तुतिरूपी कवितासुतेचा अंगिकार करा. जांबुवती

कुब्जा काय सुंदर होत्या ? त्यावरून तुम्हीं फार दयाळू दिसतां. पण माझा रोग नाहींसा केल्याशिवाय मी तुमची स्तुति करणार नाहीं. या क्षणभंगुर जगांत तुमच्या भेटीविषयीं उतावीळच झालें पाहिजे.''इतके सर्व समजून पुन्हां विषयासक्त कां ? गुणकथासुरभीची उपमा देऊन कवि म्हणतात, "त्यांत ही विषयवासना गाढवी शिरते. ही मोठी प्रबळ आहे. मोठे तपस्वी, संन्यासी, सदंड होऊन तिला हांकतात; पण व्यर्थ. खरासुरवध करणाऱ्या, तूंच हिचा नाश कर. देवा, तुम्हीं बळीला बांधलें, त्याप्रमाणें मला करूं नका. मी अशक्त. बळीला छळले, तथापि तुम्हीं दया टाकली, असें नाहीं. त्यायोगेच बळीची कीर्ति झाली. एखादे वेळेस मातापितरे निष्ठुर होतील. पण तूं, आम्हीं नेहमीं अपराध करतों तथापि 'काय करावें मुलें ऐकत नाहींत' असें म्हणतोस. पुढें नारदादिकानीं कथेचें फार महात्म्य सांगितलें आहे, असे म्हणून शेवटीं 'तुझें यशचि तारिते परि न केवळा तारवे' तेव्हां सत्संगतींत काळ गेला पाहिजे असे कवि म्हणतात. हा केकावलीचा सारांश.

आतां प्रथम म्हटल्याप्रमाणे केकावलींत पंतांची मनःची कल्पकता कशी दिसते ते पाहूं.

केकावलींत पंतांनीं ज्या निरनिराळ्या उपमा योजिल्या आहेत, त्यामध्ये इतर ठिकाणच्या सारखी उपमा थोडक्यांत न आटोपतां ती पुढच्या चारपांच श्लोकांत वाढवीत नेली आहे. म्हणजे एखादी उपमा दिल्यानंतर त्यास जुळून एका मागून एक जास्त जास्त कल्पना येऊन सर्व बाजूंनीं ती योग्य ठरविली आहे.

१. उदाहरणार्थ, एका ठिकाणीं देवास कवीच्या मनरूपीं निघालेल्या, स्तुतीरूपीं लक्ष्मीचा पति म्हटलें आहे. आतां येथेच थांबलें असतां उपमा पुरी झाली आहे. पण आपली कविता किंवा स्तुति ही जणू काय आपली कन्याच आहे व ती आपण देवास अर्पण करीत आहों, ही कल्पना मनांत येतांच तिला अनुसरून एका मागून एक कल्पना वाढूं लागल्या व कवि म्हणतात, ही माझी तुझ्या गुणास लुब्ध झालेली कन्या, तुझ्या गुणांशा अंश-

ज्यामध्यें आहे, अशा तुझ्या भक्ताकडे, तो तूंच आहेस असे समजून गेली व माझा स्वीकार करा असे म्हणू लागली. पण त्यांनीं स्वीकार केला नाहीं. कारण असे पाप त्याकडून होणार नाहीं. त्यांनीं तुजकडे बोट दाखवून हिला तुजकडे यावयास सांगितलें. म्हणून हे हरी, इला वरून मला काळजींतून मुक्त कर.' इतक्यात मनांत शंका येऊन पुढे म्हणतात 'माझ्या अपराधाकडे पाहून इला कसे वरूं म्हणशील तर जांबवती? कंस तर तुमचा शत्रु व कुब्जा त्याची दासी असून तीन ठिकाणीं वाकडी होती माझ्या कवितासुतेत जर दोष असला तर आपण तिला सजवा. हेंही होत नाहीं, इतका मी पापी आहे काय? अशा तऱ्हेनें सर्व बाजूने उपमा वाढवीत जाण्यात, तितक्या कवितांचा तरी एक ओघ दिसतो. एका विचारावरून दुसरा विचार सुचलेला दिसतो.

२. तसेच दुसऱ्या ठिकाणीं म्हटले आहे, ' देवा तुलाच स्तवन कसें सोसवतें कोणास ठाऊक. बरोबरच आहे शंकर विष पिणार नाहीं तर कसें होईल! पण येथेच न थांबता दुसऱ्या श्लोकात म्हणतात 'हे विष तर खरेंच. या स्तवनाचे सेवन केलें असतां उन्माद येतो. हें सद्यशोमुख मलीन करते. हें हलाहलापेक्षाही भयंकर. शंकर तर हलाहल एकदांच प्यायले; पण देवा, तूं हें सतत पितोस. तूं त्याच्यापेक्षां श्रेष्ठ.'

३. पुढे भगवत्कथेस सुरभीची उपमा देऊन त्यात ही विषय वासना गाढवी शिरते, असें म्हटले आहे. इतकेंच नाहीं, तर आणखी सांगतात, ' ही गाढवी शुक मुनि या गवळ्यास जशी भीत होती तशी इतरास भीत नाहीं. कितीक यति सदंड असून म्हणजे जणूं काय हातात काठी घेऊन हिला हांकतात, पण ही जात नाहीं. मग मी तर अदंड! मला घरचीला टाकून या दुसऱ्यांच्या कथासुरभीचे दूध कां पिता?' असे ही सर्वांस म्हणते. ही स्त्री आहे तेव्हां इचा वध कसा करावा म्हणशील तर बकी, ताटका इजपेक्षां बऱ्या; हिचा वध निंद्य नाहीं.

४. दुसऱ्या ठिकाणीं कथेची व मोहिनीची तुलना केली आहे. तेथेही कवि असेच वर्णितात, अहो, त्या मोहिनीने दैत्यास फसविलें. पण ही

मोठमोठ्या यतीसही भुलविते. तिने महादेवास भुलविले, त्यांत विशेष काय ? तो भोळाच. पण कथेने सुरासुरांस वेडें केले. ही सर्वांस मोहून तुलाही वश करिते. म्हणून ही गुणकथा मोहिनीपेक्षा वरचढच !'

दुसरा प्रकार. एखादा शब्द एका श्लोकांत सहज आलेला पण त्यावरून लगेच पुराणांतील कथेची आठवण व्हावी. उदाहरणार्थ, वर सांगितल्याप्रमाणें विषयवासनेस खरी म्हणजे गाढवी म्हटले त्याबरोबर लगेच 'खरासुरा'च्या वधाची आठवण होऊन कवि म्हणतात, 'खरासुरास मारिले तसे या गाढवीस मारा. ही सुद्धां एक लीलाच होईल' दुसऱ्या ठिकाणीं 'माझे अपराध पोटांत घालवत नाहींत, मग गोकुळात वणवा लागला होता तो कसा भक्षिला ?' असे म्हटलें आहे. यावरून तावडतोब 'तुमच्या जठरांतील त्या अग्नीस माझीं पापे हे अन्न द्या,' अशी कवीने दोहोंची गांठ घातली.

काहीं ठिकाणीं कवि 'सहज आठवले' असे स्पष्ट म्हणतात. 'तूं सत्यभामेचा स्वीकार कसा केलास' असे म्हणतांच **भलें स्मरण जाहलें समयिं कंसदासी करें । कशी उजरली ।** असे म्हटले आहे. दुसऱ्या एका ठिकाणी 'माझा अंत पाहूं नकोस मी अरण्यांत श्रमलों आहे,' असे म्हणून पुढे

**मुखासी जंव घातकी 'श्रम' 'अरण्य' ऐसीं पदें ।**
**निजस्मृतिस जाहलीं विषय तीं तव श्रीपदें ।**

"ती" म्हणजे जीं वना धावलीं. श्रम व अरण्य हे शब्द म्हणतांच रामावतारीं पित्याचें वचन मानण्यासाठीं तुम्हीं अरण्यात धांवला ही गोष्ट सहज आठवली.

केकावली मुळीं लिहिली कशाला ? केका म्हणजे मयुरध्वनि तर खराच. पण ही केकावली,

**मघाचें प्रतिबिंब पाहुनि सुखें नाचोनि लागे भुलें ।**
**मानी सर्व मनोरथद्रुमफळीं ओथंबले आपुले ॥**

याप्रमाणे मयुराने मोठ्या आनंदाने काढलेला ध्वनि नसून, उन्हाळ्यांतील प्रखर तापाने त्रस्त होऊन, एकसारखी मेघाची मार्गप्रतिक्षा करीत, मेघ-

वृष्टि होऊन जल मुखांत पडावे म्हणून केलेला, आक्रोश होय. पण या वेळीं सुद्धां पुराणिकबुवास आपल्या पूर्वीच्या कथा पदोपदीं आठवत. तथापि त्यांचा केवळ उल्लेख मात्र करून त्यांची ते वाट लावीत, व पुन्हां परमेश्वर स्वरूपाचें चिंतन करीत.

तिसरा प्रकार—दोन चार ठिकाणीं मागील श्लोकांत आपण म्हटले तें चूक आहेसे वाटून लगेच चुकीची दुरुस्ति केली आहे. देवास 'तुझ्यानें माझा उद्धार होत नाहीं, तर मला सज्जनांच्या स्वाधीन कर; मग ते माझी समजूत वाटेल तशी घालतील. स्वतः उद्धार करीत नाहींस, मग संताच्या स्वाधीन करण्यास कां लाजतास ?' असे म्हटले आहे. पण

**अहा निपट धृष्ट मी प्रभुवरासी 'कां लाजसी' ।**
**म्हणे.... ......... . ...... ....... ॥**

अशी दुरुस्ति केली आहे.

तसेच 'देवा तूं म्हणशील कीं, यास किती दिलें तरी हा हांवरा अधिकच मागतो.' पण पुढच्या श्लोकात—

**असें न म्हणशील तूं वरदवत्सला श्रीकरा ;**
**परंतु मज भासलें, म्हणुनि जोडितों मी करां ॥**

म्हणून माफी मागितली.

कथास कामधेनूंची उपमा दिली, पण—

**कथासि उपमा दिली सुरभिची दिसे नीट ती ।**
**परंतु बहु मंद मी, म्हणूनि सच्छ्रुती बीटती ॥**
**कथा निरुपमा, तयांप्रति पशूपमा शुद्धते ।**
**नव्हेचि, न विचारिलें बुध जनांसि क्यां उद्धतें ?**

कथा निरुपम त्यांस मीं कामधेनूंची उपमा दिली म्हणून काय झालें ? पण पशूंची उपमा दिली ना ? हे पंडितांस मान्य होणार नाहीं, मी उद्धटानें त्यांची सल्ला घेतली नाहीं.

अशा तऱ्हेने उपमा वाढवीत जाण्यावरून, एखाद्या शब्दावरून एकदम मोठी कथा आठवण्यावरून, ' बरी आठवण झाली ' अशा तऱ्हेच्या उद्गारावरून व वेळोवेळीं चुकी कबूल करून त्याबद्दल माफी मागण्यावरून, दुसरा असें म्हणेल, अशी शंका मनात येतांच आपण होऊन त्यास उत्तर देण्यावरून, काय दिसते ? मनात एक विचार यावा; व त्यासंबंधीं साधकबाधक प्रमाणे, कारणे व इतर उदाहरणे मनांत येऊन तो विचार दृढ होत जावा; एका शब्दावरून किंवा विचारावरून अनेक विचार एका मागून एक मनात येत जावेत व चूक झाल्यासही वाईट दिसेल म्हणून काढून न टाकता लागलीच दुरुस्ती करणारे साधे अंतःकरण असावे, याच गोष्टी दिसतात. सारांश, कवि शब्दरचनेंतच नव्हे, तर एकाच विषयाचे विचारांत गढून गेला आहे; आणि मननच नव्हे तर निदिध्यास लागला आहे, हे स्पष्ट दिसते.

आता मोरोपंतांच्या केकावलींतील भक्तीसंबंधाने थोडा विचार करूं. परंतु प्रथम एकंदर जुन्या कवींच्या संबंधीं व बऱ्याच अंशीं साधुसंतांविषयीं ही एक गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे कीं, **जरी आपापल्या समजुतीप्रमाणें कित्येक ठिकाणीं कांहीं विषयासंबंधीं त्यांनीं उद्गार काढले, तरी प्रमाण मानलेल्या ग्रंथांत त्या विरुद्ध कांहीं आढळल्यास तेंही खरें म्हणून ते म्हणतील.** एखाद्या ग्रंथांत अमुक कांहीं लिहिलेले आढळले कीं, त्या वेळीं तें बरोबर आहे कीं नाहीं हा संशयही मनांत न आणतां, तें खरें आहे, असे ते म्हणतील. पण तेच इतर ठिकाणीं स्वतंत्रपणाने विचार करून, आपणांस काय वाटते, ते लिहिण्याचा प्रसंग आल्यास, त्यांचे स्वतःचे मतही बाहेर दिसेल. त्यांचे कांहीं जरी मत असले तरी ज्या विचारांत ते लहानपणापासून वाढले त्या पुराण ग्रंथाचा जो जो कांहीं अधिकार वाटणें साहजिक आहे, त्यास दूर सारून पुढे येण्यास त्यांचे विचार समर्थ होत नसत. कित्येकजण जुन्या वचनाचा अर्थ निराळा करतील, किंवा तसें न करतां आल्यास, ' मागच्या काळास अनुसरून जें म्हटलें आहे तें खरें आहे; पण ऱ्या काळास तें लागू नाहीं ' असें फार तर म्हणतील. परंतु होतां होईत

त्याच्या अगदीं उलट असे कांहीं बोलणार नाहींत. याच्यापेक्षां प्राचीन काळींही हेंच आढळेल. शंकराचार्य, मध्वाचार्य वगैरेंच्या मतांत कितीसे साम्य आहे ? पण उपनिषदे व गीता सोडून कोणीही गेले नाहींत. प्रत्येकाचें त्यावर भाष्य आहे. एकाने कांहीं वचनांवर विशेष जोर देऊन आपले मत काढलें, दुसऱ्याने त्याचा अर्थ साधारण करून निराळ्या कांहीं वचनावर जोर देऊन निराळें मत काढलें. मोरोपंत वगैरे मंडळींस हेंच लागू आहे. **आपले मत स्पष्ट सांगण्याचे त्यास धैर्य नव्हते, असे नाहीं; पण जुन्या ग्रंथाच्या उलट कांहीं जोराने प्रतिपादन करण्याइतके स्वतःच्या विचारांचे महत्त्व त्यांस स्वतःसच वाटत नव्हतें.** सध्यां पाश्चात्य देशांत विचारस्वातंत्र्य म्हणून जे गाजत आहे व जे आपल्या देशातही कमीअधिक प्रमाणात वावरूं लागले आहे, जातिभेद, मूर्तिपूजा, राष्ट्रांत एकी होण्यास उपाय, देशाची सांपत्तिक, राजकीय, सामाजिक स्थिति सुधारण्यास उपाय, यासंबंधीं प्रत्येकाने विचार केला पाहिजे, त्यासंबंधीं आपले कांहीं मत असले पाहिजे, असे जे आज सर्वांस वाटत आहे; कोणतीही नवी गोष्ट निघाली, व्याख्यानांत किंवा वृत्तपत्रात कोणी कांहीं नवीन विषय आणला कीं लागलीच 'कां हो तुम्हांस यासंबंधीं काय वाटते, या विषयावर आपलें मत काय आहे' वगैरे जे प्रश्न एकमेकांस विचारलेले ऐकू येतात, असल्या विचारस्वातंत्र्याचें त्या वेळीं इतके महत्त्व कोणास वाटत नव्हते. असो.

पहिली गोष्ट म्हणजे या भवसागरातून तरून नेण्यास समर्थ असा एकच ईश्वर आहे, असे पंतांनीं म्हटले आहे. समर्थांचा श्रीरामचंद्र, तुकारामबुवांचा श्रीविठोबाराय, त्याप्रमाणे पंतानीं सर्व केकावलींत श्रीविष्णूची भक्ति केली आहे. साधुसंत त्याचाच आश्रय करितात व शंकरही त्याचेंच ध्यान करितात, असे पहिल्याच श्लोकांत म्हणून 'गदारिधरनंदकाबुजधरा'स म्हणजे या विशेषणाने केवळ विष्णूसच मी नमन करितो, असे सांगितलें इतकेंच नाहीं तर इतर देवतांविषयीं अनेक स्तोत्रे वगैरे त्यांनीं रचिलीं होतीं त्यास उद्देशून ते स्पष्ट म्हणतात.

सदैव नमितां जरी पद ललाट केलें किणें ।
नसे इतर तारितां मज भवत्पदाब्जाविणें ॥

तसेच

अगा प्रणत वत्सला, म्हणति त्या जनां पावला ।
म्हणोनि तुमच्याच मी स्वरतस सदा पावलां ॥

गंगेविषयीं ते म्हणतात ' माझे पाप ती नाहींसे करूं शकणार नाहीं. ती माझे पाप पाहून घाबरेल. मी तिला ही भीड घालणार नाहीं. साधुसंतांनींही तुजकडेस बोट दाखविले.' इतकें म्हणून सुद्धां पुन्हां जर कोणी त्यास इतर देवांचे महत्त्व नाहीं काय ? म्हणून विचारलें असते तर त्यांनीं स्पष्ट नाहीं म्हटले असते कीं काय, याचा संशयच आहे. तरी केकावलींतीलच श्लोक घेतले तर त्यात अनन्य भक्ति दिसते आणि येथें नुसत्या केकावलीपुरताच विचार करणे आहे.

'देवा, तुझ्या गुणांचा अंश जेथे दिसतो तेथे तो तूंच आहेस असें चुकून म्हणतों, इतर महात्म्यांस देवाचा अवतार समजून आम्हीं भजतों, पण तो नुसता त्या देवाचा एक अंश आहे, असेही म्हटलें आहे. यापेक्षां मोठी धर्मसुधारणा ती कोणती ? एका ठिकाणीं हरिहरात भेद नाहीं असे स्पष्ट व जोराने सांगितले आहे. नंतर स्वतःचे अपराध पाहिले तों ते अनंत दिसले.

सदैव अपराध हे रचितसे, असे कोटि गा ।
स्वयें ही कथितों, नसे तिळही लाज मी कोटि गा ॥
मला निरखितां भवच्चरण कन्यका आपगा ।
म्हणे अगइ ऐकिलेंहि न कधीं असे पाप गा ॥
विपाक न गणोनि म्यां प्रकट आपुल्या घातकें ॥
कळोनि अमितें बळें विविध जोडिलीं पातकें ॥

मा आपले सर्व बळ खर्चून:पाप केले.

मग आतां हें पाप जाणार कसे? तर केवळ तुझें नाम उच्चारल्यानें सर्व पापे नाहींशी होतात, असे प्रथम पंत म्हणतात. व त्यास अजामिळाचे उदाहरणही देतात, पण खरोखर पंतास असे वाटत होते काय? कीं केवळ ही एक म्हणण्याचीं रीत पडली आहे, तीस अनुसरून हे म्हटले आहे, तें पाहूं.

तांस जर खरोखरच असे वाटत असते तर पहिल्याच श्लोकांत,—नव्हे पहिल्याच शब्दांत केकावली संपली असती. कारण मूळ उद्देशच सफल झाला असता. पण ही गोष्ट त्यांस इतकी सहज वाटत नव्हती. प्रथम त्यांची समजूत अशीच होती, यात शंका नाहीं. व म्हणूनच स्वतः नामोच्चार केला असतांही जेव्हां पाप गेलेसें त्यास वाटले नाहीं, तेव्हा हा काय चमत्कार झालासे वाटूनच कीं काय ‘ तसाचि उरलों कसा ’ ? मी पतित नाहीं काय ? कीं कृपाच सरली, कीं दिसलों नाहीं? अशा शंका उत्पन्न झाल्या. पण थोडयाच वेळांत त्यांस हा चमत्कार वाटेनासा झाला. केवळ नामोच्चार नव्हे, ते म्हणतात, ‘मी तुमची इतकी करुणा भाकिली, तरी तुम्हीं माझा स्वीकार करीत नाहीं’ यांत ‘मजकडेचि खोटेपण. ’ दुसऱ्या ठिकाणीं ते म्हणतात, ‘ तुम्हां शरण आल्यावर वाकडें होत नाहीं. ’ पण ‘नसेचि शरणागती घडली सत्य अद्यापि ती’ म्हणून माझा रोग जात नाहीं तो घालवशील तरच तुला खरा वैद्य समजेन. केवळ नामोच्चाराने कार्य होते तर खरी शरणांगतीच घडली नाहीं असे म्हणण्याचे कारण काय? छे! केवळ वैद्याचे नांव घेऊन आपला रोग जाईलसें त्यांत वाटत नव्हते; आणि स्वतःचा रोग गेल्याशिवाय मोठा नामांकित वैद्य असला तरी त्याचा विश्वास धरण्यास ते तयार नव्हते. पुढें ते स्पष्ट म्हणतात कीं, नुसत्या तुझ्या यशवर्णनाने कार्य होत नाहीं.

**तुझें यशचि तारितें; परि न केवळा तारवे।**

तसेच

**न भागवत भेटतां न घडतांहि सत्संगती॥**

**न अज्ञ हृदयें तशीं तव यशोरसीं रंगती।**

आणि

**सहाय भगवज्जना तव सुकीर्ति जेव्हां करी ॥**
**तयींच उतरी भवोदधितटी जना लौकरी ।**

नुसत्या भक्तीनेही कार्य होत नाहीं त्यास सत्संगाची मदत पाहिजे. आता हें म्हणणे व प्रारंभी नामोच्चाराने अघनिधि तरतात, असे म्हटले आहे, त्यात किती महदंतर आहे ?

पण एका निराळ्या दृष्टीने नामाचा महिमा मोठा आहे. तोही पतांनीं वर्णन केला आहे. ज्ञानी, अज्ञानी, मुले, मोठीं माणसे, सर्वांस कथासुरभीचे दूध मिळेल. साराश, **भक्तिमार्गाची पहिली पायरी या दृष्टीनें नामाचें महत्त्व फार आहे या पायरीवर पाय ठेवतांच महा खल असला तरी तो धर्ममार्गाकडे वळण्याचा संभव आहे. पण पायरी चढली कीं सर्व मार्ग चालल्याचें श्रेय येतें, असें मात्र नाहीं.** एका ठिकाणीं ' तुझ्या नामाचा महिमा तुजपेक्षाही मोठा आहे. कारण तें वाटेल त्यास साध्य आहे, तसा तू नाहींस' असेही म्हटले आहे. एकादा तत्त्वज्ञ ठेच लागेल म्हणून जपून खालीं पहात चालतो. तोच भक्त किंवा कवि आजूबाजूची शोभा पाहात आनंदाने नाचत जातो. पण अशा तऱ्हेने नाचत उडत जाताना एखादवेळेस मार्ग सोडून थोडासा बाजूला कसा जातो, याचें हे उदाहरण आहे. या ठिकाणीं प्रत्यक्ष देवापेक्षां नामाचे महत्त्व जास्त. म्हणजे देवाच्या तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने दिसणाऱ्या कठीण स्वरूपाचे सर्वांस आकलन कारेता येणार नाहीं; व नामकीर्तन सर्वांस सोपें आहे, एवढाच अर्थ घेतला पाहिजे. मग पाप नाहींसें होण्यास भक्ताने खरोखर काय करावयाचें ? तर—

**प्रभो शरण आलियावरि न व्हा कधीं वांकडे ।**
**म्हणोनि इतुकेंचि हें स्वहित कृत्य जीवांकडे ॥**

देवाच्या दयाळुपणाविषयीं त्यांस किती खात्री होती, हें पुढील वचनावरून दिसते.'शरण आल्यावर तुम्हीं टाकीत नाहीं. आम्हास फळ मिळत नाहीं,याचे कारण मनापासून शरणच आलों नाहीं; हे वर आलेच आहे. तसेंच संसारांत अनेक संकटे येतात, उत्पात होतात, असंख्य जीवाचा संहार होतो; तेव्हां देवाच्या दयाळुपणाबद्दल संशय येतो. पंत म्हणतात, 'पुराणांत तुम्हीं बळीस छळले, अनेक खळ संगरीं मारिले, तरी दया टाकिली असे नाहीं. वेळेवर आम्हास शिक्षा करतोस पण—

**जगज्जनक तूं, मुलें सकळ जीव, या भातुकें ।**
**दयाहुनिही देशी, बा, अमृत नेदिजे घातुकें ॥**

तूं कधीं अन्यायी दिसतोस त्यांत आमचाच दोष. कारण—

**खळासि न दिसो भलें, पण खरें भल्या दीसतें ॥**

कधीं कधीं माताही मुलावर रागावते, पण त्याचे अहित व्हावे असे तीस वाटत नाहीं. देवा, तुझी कृपा ही खरी जननी. आमची माता आम्हांवर प्रेम करते, ती तुझ्याच सांगण्यावरून. तुझ्या आज्ञेनें प्रेमळ दाईप्रमाण-करते असे म्हटलें आहे. यात मातापितराच्या अनुपमेय प्रेमास योग्य मान देऊन, देवास जगज्जननी असें म्हटलें ते सार्थ आहे.

हा संसार सगळा दु:खमय आहे. व हा नेहमीं परमेश्वर प्राप्तीच्या आड येतो, असें सर्वांस वाटते. त्याविषयीं पंतांस काय वाटत होतें ते खालील उताऱ्यावरून सहज कळेल. ते म्हणतात,'देवा तुझे उपकार अगणित आहेत.'

**पटुत्व सकलेंद्रियीं मनुजता सुवंशीं जनीं ।**
**द्विजत्वहि दिले भलें बहु अलभ्य जें कीं जनीं ॥**
**यशः श्रवण कीर्तनीं रुचि दिली [illegible] हा वरा ।**
**म्हणे अधिक द्याच कीं अखिल याचकों हांवरा ॥**

अतिशय उपकार आहेत, तथापि

**दिलें बहु बरें खरे परि गमे कृपा व्यंग तो ।**

ती कृपा व्यंग वाटते. का ? एक गोष्ट कमी आहे ती असेल तर सर्व ठीक; नाहीं तर हे कांहीं नको.

कराल पुरती दया तरी असो, दिले पावले ! ।
परंतु हरि, एकदां त्वरित दाखवा पावलें ॥
प्रसाद करणें मनीं जरी नसेल, हें आवरा ।
जया बहु, तयासि द्या, मज कशास ? मी हांवरा ॥

साराश, प्रपंचाचीही किंमत जाणून. प्रपंच व परमार्थ यांची योग्य सांगड घालून दिली आहे. त्यांची दृष्टि फार दूर होती, त्याचे लक्ष उच्च होते. यासाठीं स्वतःस हावरा म्हटले.

देवाचे स्तवन करिता येत नाहीं त्यासंबंधाने ते म्हणतात:—

म्हणा मनिं असे, कसें प्रथम नीट ये लेंकरा ? ।
हळहळू पटु स्वयें सुपथिं लावियेलें करा ॥

शिवाय स्तुति नीट करिता येत नाहीं म्हणून काय झालें ?

जनीं तरि असे असे, शिशुहि जे मुखें वण वी ।
पिता पिऊनि ते भुले, मधुरता मुखें वर्णवी ॥

आणि हे प्रभो, तुझी स्तुति करायची म्हणजे त्याला तुझ्यासारखाच कवि पाहिजे. तसे कधीं जमणार ? स्तुति नीट करितां येत नाहीं म्हणून ती मुळींच न करणेही ठीक होणार नाहीं. तेव्हां जसा येईल तसा तुमचा स्तव करितों. पण नेहमीं येईल तशीच स्तुति करून त्यातच तृप्त राहिलों, तर सुधारण्यास जागा कोठे राहिली ? म्हणून—

म्हणे स्वकृतिच्या उणें किमपि एक वर्णी न हो ।
असें तज कधीं बरें विगतशंक वर्णीन हो ॥
असेचि अशि आवडी.................. ॥